**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६१५/२०२२.**
परवेज पठाण **वि.** कोणी नाही
CNR No.- MHLA060028092022.

**<u>निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम–२ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार, मसुद, नजीब, मुजीब, याहीया, एजास, आय्याज व निसार ही मयताची मुले आहेत. जकीया बेगम फेरोज पठाण ही मयताची सुन आहे. शबाना जहांगीर शेख आणि झीनत मुजम्मिल सय्यद ह्या मयताच्या मुली आहेत. तसेच अमीर आणि शाहरुख ही मयताची नातु आहेत. मयत **सईदाबेगम जलील अहेमद पठाण** यांचे दिनांक ०८/०५/२०१८ रोजी मीथ्री हॉस्पीटल, आर.सी.पुरम, हैद्राबाद, राज्य तेलंगना येथे निधन झाले आहे. मयतास उपरोक्त वारस आहेत, इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारास मयताच्या नावे असलेली मालमत्ता नामनिर्देशानासाठी व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात कोणाची काही हरकत आहे का ? याबाबत जाहीर प्रगटन निशाणी क्र.**१४** वर 'दैनिक विचारवंत नेता' या वर्तमानपत्रात दि.१२ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु, अद्याप सदर प्रकरणात कोणाचीही काहीएक हरकत प्राप्त झाली नाही.

४. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.**१०** वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने सदर शपथपत्रामध्ये प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुराचा समावेश केलेला आहे. उपरोक्त वारसदार हेच मयताचे एकमेव वारस आहेत व त्यांच्याशिवाय इतर वारस नाहीत असे नमुद केले आहे. अर्जदाराने मयताच्या मूत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.**११** वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत **सईदाबेगम जलील अहेमद पठाण** यांचे दिनांक ०८/०५/२०१८ रोजी मीथ्री हॉस्पीटल, आर.सी.पुरम, हैद्राबाद, राज्य तेलंगना येथे निधन झाले आहे. तसेच ते अहमदपूर, ता.अहमदपूर, जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्याप्रमाणे मृत्युप्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यामार्फत देण्यात आले आहे. अर्जदाराने वारसाचे

प्रमाणपत्र निशाणी क्र.**१९** वर दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत **सईदाबेगम जलील अहेमद पठाण** यांस उपरोक्त वारसदार आहेत. सदर प्रमाणपत्र हे नगरसेवक, नगर परिषद, अहमदपूर, ता.अहमदपूर यांनी दिलेले आहे. तसेच अर्जदाराने मयत सईदाबेगम यांचा मयत मुलगा फिरोजखान यांचे मृत्यूप्रमाणपत्र निशाणी क्र.**१३** वर दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता, मयत **फिरोजखान जलील अहमद पठाण** यांचे दि.१३/११/२०१९ रोजी अहमदपूर, ता.अहमदपूर व जि.लातूर येथे निधन झाले आहे. अर्जदाराने निशाणी क्र.**१६** वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदाराने दिलेल्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त वारसदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता असे दिसून येते की, उपरोक्त वासरदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार **१. परवेज जलील अहेमद पठाण, २. मसुद जलील अहेमद पठाण, ३. जकीया बेगम फिरोज पठाण, ४. अमीर फिरोज पठाण, ५. शाहरुख फिरोज पठाण, ६. नजीब जलील अहेमद पठाण, ७. मुजीब जलील अहेमद पठाण, ८. याहीयाखान जलील अहेमद पठाण, ९. एजास जलील अहेमद पठाण, १०. शबाना जहांगीर शेख, ११. आय्याज जलील अहेमद पठाण, १२. निसार जलील अहेमद पठाण** व **१३. झीनत मुजम्मिल सय्यद** हे मयत **सईदाबेगम जलील अहेमद पठाण** यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) सिव्हील मॅन्युअल प्रकरण–१४ मधील परिच्छेद–३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

४) अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला असे.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHWINI SHRIKANT JARUDE
Date: 2023.03.20 10:38:26 +0530

**(ए.एस. जरुदे)**

दिनांकः– १४/०३/२०२३.

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अहमदपूर, जिल्हा लातूर.